(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

क्र.पोमसं/३-अ/पदो/रापोउपनि ते रापोनि/३४/२०२१
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई-४०० ००१.
दि. २७/०५/२०२१.

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, अर्धशासकिय पत्र क्र. पीएमएन-०१०९/क्र.५१५/ पोल-५ब, दि.०६/०७/२००९.

२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र. पीएमएन-०१०९/प्र.क्र.५१५/पोल-५ब, दि.१०/०८/२००९ व

३. सन २०१४, महाराष्ट्र अधिनियम क्र.१४, दि.२५ जून २०१४ व सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.११ दि.०६ एप्रिल २०१५

४.शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, आणि अधिसूचना सुधारणा दि.१६/०७/२०१५ व दि.१५/०६/२०१७.

५.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या.१२, दि.१५/१२/२०१७, दि.३०/०८/२०१८.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९.

७.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१.

-: आदेश :-

शासनाने संदर्भ क्र.०७ मध्ये नमूद केलेल्या दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याचा विभागीय पदोन्नती समितीने निर्णय घेतला आहे.

२. शासनाने संदर्भ क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या दिनांक १५/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे पदोन्नतीच्या कोट्यातील राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रापात्रता तपासण्यात आली असता, खालील नमूद राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरविले आहे. खालील नमूद १९ राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी तसेच, महसुल विभागाच्या वाटपास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

३. उपरोक्त संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र पोलीस अधिनियम,१९५१ मधील कलम-२२ न चे पोटकलम (२) व त्याखालील सुधारित स्पष्टीकरणानुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद राखीव पोलीस उपनिरीक्षक यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांका पासून " **राखीव पोलीस निरीक्षक** " पदावर **तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ मधील घटकांत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. :-

अ.क्र.	राखीव पोलीस उपनिरीक्षकांचे नांव	सध्याची नेमणूक	वाटप महसुल संवर्ग	रापोनि पदावर तात्पुरत्या पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण
१	२	३	४	५
१.	विनोद उत्तमराव तांबे	अकोला	अमरावती	पो.प्र.केंद्र, अकोला
२.	प्रशांत वसंतराव सुगरवार	गडचिरोली	औरंगाबाद	औरंगाबाद शहर
३.	शिवाजी गंगाराम राठोड	धुळे	कोकण-२	मुंबई शहर
४.	धनराज विठ्ठल वाभिटकर	पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड	कोकण-२	मुंबई शहर
५.	मजीद बसीर शेख	हिंगोली	अमरावती	पो.प्र.केंद्र, अकोला
६.	कैलास तुकाराम सोनावणे	नाशिक शहर	कोकण-२	पो.प्र.केंद्र, मरोळ
७.	रविंद्र प्रकाश बनतोडे	म.पो.अ. नाशिक	नाशिक	धुळे
८.	प्रल्हाद पांडुरंग राठोड	पो.प्र.केंद्र, बाभळगाव- लातूर	औरंगाबाद	पो.प्र.केंद्र, बाभळगाव-लातूर
९.	राजु तिम्मा शिंदे	पो.प्र.केंद्र, सोलापूर	पुणे	पो.प्र.केंद्र,तुरची- तासगांव
१०.	राजेश दामोदर सरोदे	चंद्रपूर	नागपूर	पो.प्र.केंद्र, नागपूर
११.	शंकर मारोती जंगवाड	मपोअ. नाशिक	नाशिक	पो.प्र.केंद्र, धुळे
१२.	संग्राम राजाराम जाधव	बृहन्मुंबई	कोकण-२	पो.प्र.केंद्र, मरोळ
१३.	विकास जगन्नाथ देवकर	सांगली	पुणे	पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड
१४.	लक्ष्मण प्रकाश साळुंखे	पो.प्र.केंद्र, मरोळ	कोकण-२	पो.प्र.केंद्र, मरोळ
१५.	भरतसिंग जगन्नाथसिंग ठाकुर	नागपूर शहर	अमरावती	पो.प्र.केंद्र, अकोला
१६.	प्रदिप महादेव मोहिते	बृहन्मुंबई	कोकण-२	पो.प्र.केंद्र, मरोळ
१७.	पांडुरंग गणपत नलावडे	पो.प्र.केंद्र, मरोळ	पुणे	पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड
१८.	महेश शिवराम साळवी	पो.प्र.केंद्र, खंडाळा	पुणे	पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड
१९.	दिपक दिगंबर लोणकरे	पो.प्र.केंद्र, सोलापूर	पुणे	पो.प्र.केंद्र, सोलापूर

४. उपरोक्त राखीव पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, आणि कार्यमुक्त केल्याचा, तसेच राखीव पोलीस निरीक्षक पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक कृपया **तातडीने** या कार्यालयास कळवावा.

५. वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षक यांचेविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कार्यवाही केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असले / सौम्य शिक्षेची अमंलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असले, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तसेच त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसेल तर संबंधित घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलद्वारे / फॅक्सद्वारे तात्काळ पाठवावी व पुढील आदेशांची वाट पहावी.

सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधिन दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

पदोन्नती झालेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यापुर्वी ते ज्या घटकांत जाणार आहेत, त्या घटकप्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. रिक्त पद नसल्यास तसे या कार्यालयास कळवावे.

सदर पदोन्नती आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक हे जर आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकांत कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे.

सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

पदोन्नत झालेल्या सर्व राखीव पोलीस उपनिरीक्षकांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.

संजय पांडे
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह),
पोलीस आयुक्त, नाशिक शहर/ नागपूर शहर/ औरंगाबाद शहर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक/ नागपूर/ औरंगाबाद/ कोल्हापूर/ अमरावती/ गडचिरोली/ नांदेड.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस अधीक्षक, अकोला/ गडचिरोली/ धुळे/ हिंगोली/ चंद्रपूर/ सांगली.
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड/ बाभळगांव-लातूर/ सोलापूर/ अकोला/ मरोळ/ तुरची-तासगांव/ नागपूर/ खंडाळा/ धुळे.

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, मुंबई-१/ नागपूर-२.
कार्यासन अधिकारी, का.क्र. ०९/११-अ/३६/४०.
पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, कार्यालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर WWW.mahapolice.gov.in येथे एक महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

27/5

(कुलवंत कु. सारंगल)
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचे करिता